0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचा दिनांक ०६/०२/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०११/जा.१२७, दिनांक १७/०२/२०११.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचे दिनांक ११/०३/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनीचे मालक अब्दुल गफार मोहम्मद हसन शेख व जितेंद्र पुनमचंद शहा यांचे दिनांक ११/०३/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचे दिनांक ०७/०२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत.

६) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचे दिनांक ०४/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०११/जा. २९८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक : ०८/०५/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनी, कालीना मोटर वर्क्स कंपाऊंड, चुनाभट्टी, कुर्ला कालीना रोड या गोडावूनमध्ये गफार नावाच्या इसमाने मोठ्या प्रमाणात अवैधरित्या विनापरवाना पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा करुन ठेवला असून ते सदर ठिकाणी कमी प्रतीच्या पेट्रोलमध्ये कोणतेतरी रासायनिक द्रव्य व पावडर भेसळ करुन सदरचे ऑईल उच्च प्रतीचे आहे असे भासवून गिऱ्हाईकांना विक्री करतो, अशी खात्रीलायक खबर दिनांक २७/०१/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषन विभाग, मुंबई यांना मिळाल्यावरुन तेथील अधिकाऱ्यांनी दोन पथके तयार केली व दोन्ही पथके कुर्ला कालिना रोड येथे कारवाईसाठी रवाना झाली. गोपनिय माहितीनुसार अगोदरच हेरुन ठेवलेल्या

0002
जागेवर दोन्ही पथकांनी पोलिसांचे अस्तित्व जाणवणार नाही अशा पध्दतीने पाळत ठेवली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनी, कालीना मोटर वर्क्स कंपाऊंड, चुनाभट्टी, कुर्ला कालीना रोड या ठिकाणी दोन पंचाना पाचारण करुन पंचासह सदर गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, त्या गोडावूनध्ये एक इसम बसलेला असल्याचे दिसून आले. अधिकाऱ्यांनी त्या इसमास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव अब्दुल गफार मोहम्मद हसन शेख असे सांगितले. त्यास त्याचेकडे पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा करण्याचा व त्यावर प्रोसेसिंग करण्याचा कोणता परवाना आहे काय ? याबाबत विचारणा केली असता, त्याने त्याच्याकडे असा कोणताही परवाना नसल्याचे सांगून त्याने त्याचेकडील ल्युब ऑईल विकण्याचा परवाना सादर केला. सदर परवान्यामध्ये (only for the activity of sale) Trading activity without Storage असे नमूद केले होते. यावरुन त्याने पेट्रोलजन्य पदार्थाची विनापरवाना साठा करुन ठेवल्याची नमूद पथकाची खात्री झाल्याने त्याच्या समंतीने गोडावूनची पहाणी केली असता, गोडावूनमध्ये २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले २०० ड्रम एकूण ४०,००० लिटर, २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईलने व इतर ऑईलने भरलेले ७० ड्रम एकूण १४,००० लिटर, ३५ लि. क्षमतेचे ल्युब ऑईलने भरलेले ०३ प्लॅस्टीक कॅन एकूण १०५ लि. ऑईल, २०० लि. क्षमतेचे ५० रिकामे लोखंडी ड्रम, भेसळीसाठी लागणारे साहित्य २००० लि. क्षमतेच्या ०६ रिकामी लोखंडी टाक्या, लोखंडी बादली एक, ०४ नरसाळे, १० लि. क्षमतेचे ०२ मापे, २० लि. क्षमतेचे ०२ रिकामे ड्रम, १० किलो पांढऱ्या रंगाची पावडर, १ लोखंडी घाना, ०२ प्लॅस्टिक पाईप, ०३ इलेक्ट्रीक मोटार, पाईप लावलेल्या ०२ हातपंप असा एकूण ११,३०,१००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल मिळून आला.

ताब्यात घेण्यात आलेला इसम नामे अब्दुल गफार महमंद हसन शेख याचेकडे अधिकाऱ्यांनी विचारपूस केली असता, त्याने बाजूच्या गोडावूनमध्ये सुध्दा पेट्रोलजन्य पदार्थाचा अवैधरित्या साठा करुन ठेवल्याचे सांगितल्याने सदर गोडावूनची तपासणी केली असता, गोडावूनमध्ये २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले ५० ड्रम एकूण १०,००० लिटर ऑईल, २०० लि. क्षमतेचे ३५ लोखंडी रिकामे ड्रम तसेच भेसळीसाठी लागणारे साहित्य २००० लि. क्षमतेची एक रिकामी लोखंडी टाकी, लोखंडी घाना, हातपंप व पांढरा पावडर किलो असा एकूण २,१३,०००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल मिळून आला.

तद्नंतर त्याच्याकडे अधिक चौकशी करता त्याने सांगितले की, त्याच्या पाठीमागे जितूभाईच्या गोडावूनमध्ये सुध्दा अवैधरित्या पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा करुन ठेवलेला आहे. अशी माहिती दिल्यावरुन पोलिसांनी पंचासह सदर ठिकाणी प्रवेश केला असता, सदर गोडावूनमध्ये कोणीही इसम मिळून आला नाही. आजूबाजूच्या लोकांना गोडावून मालकाबाबत विचारपूस केली असता, त्यांच्याकडून समजले की, सदरचे गोडावून हे जितूभाई नावाच्या

इसमाचे असून तो थोडया वेळापूर्वीच पोलिस आल्याची माहिती मिळाल्याने गोडावून उघडे सोडून निघून गेला आहे. सदर गोडावूनची तपासणी केली असता गोडावूनमध्ये, २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले ७५ ड्रम एकूण १५,००० लि. ऑईल तसेच भेसळीसाठी लागणारे साहित्य हातपंप ०२, नरसाळे ०२, लोखंडी पाना ०१, मीटर पट्टी असा एकूण ३,०२,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी त्यांच्या गोडावूनमध्ये विनापरवाना व अवैधरित्या पेट्रोलजन्य व ल्युब ऑईल यासारखा ज्वालाग्राही पदार्थांचा साठा करुन ठेवला व सदर पेट्रोलजन्य पदार्थामध्ये कोणतेतरी रासायनिक द्रव व पावडर भेसळ करुन सदरचे ऑईल हे उच्च प्रतीचे आहे असे भासवून सदर साठा गिऱ्हाईकांना विकण्यासाठी गोडावूनमध्ये ठेवल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) भा. द. वि. चे कलम ४२० (२) दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन ऑर्डर - १९८७ चे कलम ३, ४ सह (३) दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लोप (ॲक्विझीशन, सेल, स्टोरेज ॲन्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल) (अनुज्ञापन) ऑर्डर २००७ चे कलम ३, ४ (४) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२), ८ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द वाकोला पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३६/२०११, दि.२८/०१/२०११ (गु.शा.नि, गु.र.क्र. ०२/२०११) अन्वये गुन्हा नोंद करुन वरील तीनही गोडावूनमधील खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| | गोडावून क्र. १ मधील मुद्देमाल | | |
| १ | २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले २०० ड्रम | ४०,००० लि. | ८,००,०००/- |
| २ | २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईलने व इतर ऑईलने भरलेले ७० ड्रम | १४,००० लि. | २,८०,०००/- |
| ३ | ३५ लि. क्षमतेचे ल्युब ऑईलने भरलेले ०३ प्लॅस्टीक कॅन | १०५ लि. | २,१००/- |
| ४ | २०० लि. क्षमतेचे ५० रिकामे लोखंडी ड्रम | ५० नग | १०,०००/- |
| ५ | भेसळीसाठी लागणारे साहित्य २००० लि. क्षमतेच्या ०६ रिकामी लोखंडी टाक्या, लोखंडी बादली एक, ०४ नरसाळे, १० लि. क्षमतेचे ०२ मापे, २० लि. क्षमतेचे ०२ रिकामे ड्रम, १० किलो पांढऱ्या रंगाची पावडर, १ लोखंडी घाना, ०२ प्लॅस्टिक पाईप, ०३ इलेक्ट्रीक मोटार, पाईप लावलेल्या ०२ हातपंप | - | ३८,०००/- |
| | गोडावून क्र. २ मधील मुद्देमाल | | |
| ६ | २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले ५० ड्रम | १०,००० लि. | २,००,०००/- |
| ७ | २०० लि. क्षमतेचे ३५ लोखंडी रिकामे ड्रम | ३५ नग | ७,०००/- |
| ८ | भेसळीसाठी लागणारे साहित्य २००० लि. क्षमतेची एक रिकामी लोखंडी टाकी, लोखंडी घाना, हातपंप व पांढरा पावडर ५० किलो | - | ६,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | गोडावून क्र. ३ मधील मुद्देमाल | | |
| ९ | २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले ७५ ड्रम | १५,००० लि. | ३,००,०००/ |
| १० | भेसळीसाठी लागणारे साहित्य हातपंप ०२, नरसाळे ०२, लोखंडी पाना ०१, मीटर पट्टी | | २,०००/ |
| | | एकूण | १६,४५,१००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबधिताना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ११/०३/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ११/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई येथील पोलिस कॉन्सेबल श्री. प्रमोद एम. पाटील (ब.क्र. ९६०७९६) हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस वकालतनाम्यासह ॲड. श्री. किर्ती पारेख हे त्यांचे अशिल ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनीचे मालक अब्दुल गफार मोहम्मद हसन शेख तसेच जितेंद्र पुनमचंद शहा यांचेसह उपस्थित राहिले व त्यांचे अशिलांनी वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलल्या गोडावून मधील द्रवपदार्थामध्ये कोणतेतरी रासायनिक द्रव्य व पावडर भेसळ करुन सदरचे ऑईल उच्च प्रतिचे आहे, असे भासवून विक्री करीत असल्याचे पंचनाम्यात नमूद केले आहे. त्यामुळे जप्त केलेला द्रवपदार्थाबाबत अंतीम निर्णय घेण्यापूर्वी सदरचा पदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याची सत्यसत्यता पडताळणीसाठी रासायनिक पृथ:करण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याने सदरचा पृथ:करण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तद्नंतर वाचावे क्र. ५ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांनी रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत सादर केली असून सदर अहवालामध्ये, 1) Exhibit Nos. 1 and 4 contain petroleum hydrocarbon oil having density at 30 °C is 0.851 and 0.836 respectively and flash point 125 °C, 2) Exhibit No. 2 contains petroleum hydrocarbon oil with blue dye and water, 3) Exhibit No. 3 and 6 contain sodium carbonate, 4) Exhibit No. 5 contain petroleum hydrocarbon oil and water असे नमूद आहे.

प्रस्तूत प्रकरणी ३ गोडावूनमधून मुद्देमाल जप्त केला असल्यामुळे उपरोक्त पृथ:करण अहवालामध्ये नमूद नमूने (exhibits) हे कोणत्या गोडावूनमधील आहेत, याचा बोध होत नसल्याने वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचेकडून अहवाल मागविण्यात आला असता, सदरचा गोडावून निहाय अहवाल वाचावे क्र. ६ अन्वये वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांनी सादर केला.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

**युक्तिवाद :-**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचे दिनांक ०६/०२/२०११ रोजीच्या टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, गोडावूमधून जप्त केलेला माल हा अवजड, वाहतुकीस धोकादायक असल्याने सदर माल सुरक्षिततेसाठी त्याच ठिकाणी सिलबंद करुन ठेवण्यात आला आहे. तरी सदरचा माल हा ज्वलनशिल असल्यामुळे तो जास्त दिवस गोडावूनमध्ये ठेवणे शक्य नाही. तरी सदर मालाची विल्हेवाट लावण्याबाबत योग्य ते आदेश होणेस विनंती केली आहे. तसेच दिनांक ११/०३/२०११ रोजीच्या सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील जप्त केलेल्या मालाचे नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेले आहे. त्याबाबतचा अहवाल येणे बाकी आहे. तरी सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल आरोपीतास परत करण्यास पोलिसांची सक्त हरकत आहे, असे नमूद आहे.

दिनांक ११/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अॅड. किर्ती पारेख यांनी त्यांचे अशिल गोदाम क्र. १ व २ तसेच ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनीचे मालक अब्दुल गफार मोहम्मद हसन शेख यांचेवतीने युक्तीवाद केला की, त्यांचे अशिल हे मे. ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनीचे मालक असून त्यांच्या कंपनीच्या नावे उद्योग सहसंचालक यांचेकडील ल्युब्रिकंटस ऑर्डर, १९८७ नुसार जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अन्वये परवाना आहे. सदर परवाना निर्गमित करताना त्यांचे अशिलास साठवणूक शिवाय व्यवसायाची परवानगी होती. तथापी, तद्नंतर केलेल्या सुधारणेत त्यांना ल्युब्रिकंट साठवणूकीची परवानगी देण्यात आली आहे. त्यांच्या अशिलाच्या कंपनीच्या नांवे बृहन्मुंबई महानगरपालिकाकडील ल्युब्रिकंट साठवणूकीचे २३००० लिटर कमाल मर्यादा असलेले साठवणूकीचा परवाना आहे. त्यांची नमूद कंपनी अधिकृतरित्या नामांकित कंपनीकडून ल्युब्रिकंटचा साठा खरेदी करुन बाजारात विक्री करीत आहे. याबाबत दैनदिन व्यवहाराची नोंदणी करुन त्यांचे अशिल प्राप्तीकर भरीत असल्याचे सांगितले. दि.२७/०१/२०११ रोजी पोलिसांनी त्यांच्या अशिलाच्या कालिना मोटार वर्क्स कंपाऊंड, चुनाभट्टी, कुर्ला-कालिना

रोड, मुंबई येथील गोदामास भेट देऊन त्यांच्या दोन्ही गोदामातील ल्युब्रिकंटसचा साठा व इतर वस्तू जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८, ल्युब्रिकेटिंग ऑर्डर, १९८७ तसेच महाराष्ट्र सॉल्वंट ऑर्डर, २००७ च्या तरतुदींचा भंग केल्याने गुन्हा दाखल करुन जप्त करण्यात आला आहे. तसेच पोलिसांनी त्याचे दोन्ही गोदाम सिलबंद केले आहे. पोलिसांनी गोदाम क्र. १ मधून २७० ड्रम व तीन प्लॅस्टिक कॅनमधील ५४१०५ लिटर ल्युब्रिकंटचा साठा जप्त केला आहे. याव्यतिरिक्त पोलिसांनी ५० रिकामे ड्रम, ६ लोखंडी टाक्या, ३ इलेक्ट्रीक मोटार, २ हातपंप इत्यादी वस्तूंही जप्त केल्या आहेत. पोलिसांनी त्यांचे अशिलाच्या गोदाम क्र. २ मधून ५० ड्रम मधील १०००० लिटर ल्युब्रिकंटचा साठा व ३५ रिकामे ड्रम, १ लोखंडी टाकी, हातपंप व इतर वस्तूंही जप्त केल्या आहेत. त्यांचे अशिलाने कोणताही गुन्हा केलेला नसून उद्योग सहसंचालक यांचेकडील परवान्यानुसार त्यांचे अशिल ल्युब्रिकंटच्या व्यवसायाकरिता पात्र असून तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडील अनुज्ञप्तीनुसार त्यांचे अशिलास ल्युब्रिकंटच्या साठवणूकीचे कमाल मर्यादा नमूद नाही. त्यामुळे त्यांना साठवणूकीस कमाल मर्यादा लागू नाही. त्यामुळे कितीही साठवणूक केली तरी त्यांच्या अशिलाकडून ल्युब्रिकेटींग ऑर्डर, १९८७ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग होत नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील साठवणूकीच्या परवान्यावर २३००० लिटरची कमाल मर्यादा असली तरी त्यांच्या अशिलाने बीएमसी ॲक्टचे कलम ३९४ व ४७१ चा भंग केल्यावरुन त्यांना दंड आकारला जाऊ शकतो. तसेच बीएमसी ॲक्टच्या तरतुदींचा भंग हा जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत येत नाही. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केला असल्यास कलम ६-अ नुसार सदरचा साठा जप्त करण्याचे अधिकार आहेत. पूर्वी नमूद केल्यानुसार ल्युब्रिकंट ऑर्डर, १९८७ तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग झाला नसल्याने सदरचा साठा जप्त करण्यात येऊ नये. महाराष्ट्र सॉल्वंट ऑर्डर, २००७ ही त्यांच्या अशिलास सॉल्वंटचा व्यवसाय करीत नसल्याने लागू होत नाही. तसेच ल्युब्रिकंटचा साठा हा महाराष्ट्र सॉल्वंट ऑर्डर, २००७ अंतर्गत येत नसल्याने सदर आदेश त्यांना लागू होत नाही. त्यांचे अशिल ल्युब्रिकंटच्या साठ्याचे अधिकृत व्यवसाय करीत आहेत. तसेच त्यांचे अशिलास त्यांच्या गोदाम सिलबंद करुन साठा जप्त केल्याने आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर साठ्याचे खरेदीबाबतचे सर्व दस्ताऐवज पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे सांगून सदर व्यवसायावर त्यांच्या अशिलाच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने जप्त करण्यात आलेला ल्युब्रिकंटचा संपूर्ण साठा त्यांच्या अशिलास योग्य त्या अटी व शर्तीवर परत करुन त्यांचे सिलबंद केलेले गोदाम सिलमुक्त करण्याचे विनंती करुन तसे त्यांच्या अशिलाचे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ११/०३/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ॲड. किर्ती पारेख यांनी त्यांचे अशिल गोदाम क्र. ३ चे मालक जितेंद्र पुनमचंद शहा यांचेवतीने युक्तीवाद केला की, त्यांचे अशिल हे जे.पी. ल्युब्रिकंटसचे मालक असून

त्यांचे कुर्ला कालिना रोड, मुंबई येथे गोदाम आहे. सदर कंपनीच्या नावे त्यांचे अशिलाकडे जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत उद्योग सहसंचालक यांचेकडील ल्युब्रिकंटच्या व्यवसायाकरिता आवश्यक असणारा परवाना असून या व्यतिरिक्त त्यांचे अशिलाकडे बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील नमूद गोदामावर १५००० लिटर ल्युब्रिकंट साठवणूक करण्याकरिता साठवणूकीचा परवाना आहे. दि.२७/०१/२०११ रोजी पोलिसांनी त्यांच्या अशिलाच्या गोदामास भेट देऊन ७५ ड्रममधील १५००० लिटर ल्युब्रिकंटसचा साठा, दोन हातपंप इत्यादी मुद्देमाल जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८, ल्युब्रिकेटिंग ऑर्डर, १९८७ तसेच महाराष्ट्र सॉल्वंट ऑर्डर, २००७ च्या तरतुदींचा भंग केल्याने गुन्हा दाखल करुन जप्त करण्यात आला आहे. सदरचा सर्व जप्त मुद्देमाल पंचनामा करुन सदर गोदाम सिलबंद केले आहे. त्यांचे अशिलाने कोणताही गुन्हा केलेला नसून उद्योग सहसंचालक यांचेकडील परवान्यानुसार त्यांचे अशिल ल्युब्रिकंटच्या व्यवसायाकरिता पात्र असून तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडील अनुज्ञप्तीनुसार त्यांचे अशिलास ल्युब्रिकंटच्या १५००० लिटर साठ्याचे साठवणूकीस परवानगी आहे. सदरचा साठा हा विहित कमाल मर्यादेच्या आत असल्याने त्यांचे अशिलाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केलेला नाही. महाराष्ट्र सॉल्वंट ऑर्डर, २००७ ही त्यांच्या अशिलास सॉल्वंटचा व्यवसाय करीत नसल्याने लागू होत नाही. तसेच ल्युब्रिकंटचा साठा हा महाराष्ट्र सॉल्वंट ऑर्डर, २००७ अंतर्गत येत नसल्याने सदर आदेश त्यांना लागू होत नाही. त्यांच्या अशिलाकडे ल्युब्रिकंटच्या साठ्याचे वैध खरेदी बिले असून ते अधिकृत व्यवसाय करीत आहेत. तसेच पोलिसानी ल्युब्रिकंट साठ्याचे खरेदी व विक्रीचे सर्व दस्ताऐवज ताब्यात घेतले आहेत. त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केला नसल्याने त्यांचा सदरचा साठा जप्त करु नये. तसेच त्यांचे अशिलास त्यांच्या गोदाम सिलबंद करुन साठा जप्त केल्याने आर्थिक नुकसान होत आहे. सदर व्यवसायावर त्यांच्या अशिलाच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने जप्त करण्यात आलेला १५००० लिटर ल्युब्रिकंटचा साठा, हातपंप इत्यादी वस्तू त्यांच्या अशिलास परत करुन त्यांचे सिलबंद केलेले गोदाम सिलमुक्त करण्याची विनंती करुन तसे त्यांच्या अशिलाचे लेखी निवेदन सादर केले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचे दिनांक ०४/०४/२०१२ रोजीच्या टपालामार्फत प्राप्त अहवालात, आरोपी अब्दुल गफार यांचे गोडावून क्र. १ मधून जप्त केलेल्या मालापैकी प्रदर्शित ए यास exhibit १ असे संबोधण्यात येऊन त्यामध्ये घटनास्थळी पंचनाम्याद्वारे जप्त केलेल्या लोखंडी ड्रममधून काढलेले नमूने, प्रदर्शित बी यास exhibit २ असे संबोधण्यात येऊन त्यामध्ये ३५ लिटर क्षमतेच्या भरलेल्या प्लॅस्टिक कॅनमधून घटनास्थळी पंचनाम्याद्वारे काढलेले नमूने, प्रदर्शित सी यास exhibit ३ असे संबोधण्यात येऊन त्यामध्ये घटनास्थळी पंचनाम्याद्वारे जप्त केलेल्या पांढऱ्या रंगाच्या पावडरच्या गोणीमधून नमूने

काढल्याचे नमूद आहे. आरोपी अब्दुल गफार यांचे गोडावून क्र. २ मधून जप्त केलेल्या मालापैकी प्रदर्शित डी यास exhibit ४ असे संबोधण्यात येऊन त्यामध्ये घटनास्थळी पंचनाम्याद्वारे जप्त केलेले लोखंडी ड्रममधून काढलेले नमूने, प्रदर्शित एफ यास exhibit ६ असे संबोधण्यात येऊन त्यामध्ये घटनास्थळी पंचनाम्याद्वारे जप्त केलेल्या पांढऱ्या रंगाच्या पावडरच्या गोणीमधून काढलेले नमूने तसेच आरोपी जितेंद्र पुनमचद शहा यांचे गोडावून क्र. ३ मधून जप्त केलेल्या मालापैकी प्रदर्शित ई यास exhibit ५ असे संबोधण्यात येऊन त्यामध्ये घटनास्थळी पंचनाम्याद्वारे जप्त केलेल्या लोखंडी ड्रममधून नमूने काढल्याचे नमूद आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तीवाद, निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनी, कालीना मोटर वर्क्स कंपाऊंड, चुनाभट्टी, कुर्ला कालीना रोड या गोडावूनमध्ये गफार नावाच्या इसमाने मोठ्या प्रमाणात अवैधरित्या विनापरवाना पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा करुन ठेवला असून ते सदर ठिकाणी कमी प्रतीच्या पेट्रोलमध्ये कोणतेतरी रासायनिक द्रव्य व पावडर भेसळ करुन सदरचे ऑईल उच्च प्रतीचे आहे असे भासवून गिऱ्हाईकांना विक्री करतो, अशी खात्रीलायक खबर दिनांक २७/०१/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषन विभाग, मुंबई यांना मिळाल्यावरुन तेथील अधिकाऱ्यांनी दोन पथकासह ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनी, कालीना मोटर वर्क्स कंपाऊंड, चुनाभट्टी, कुर्ला कालीना रोड या ठिकाणी दोन पंचाना पाचारण करुन पंचासह सदर गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, त्या गोडावूनध्ये एक इसम नामे अब्दुल गफार मोहम्मद हसन शेख यास त्याचेकडे पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा करण्याचा व त्यावर प्रोसेसिंग करण्याचा कोणता परवाना आंहे काय ? याबाबत विचारणा केली असता, त्याने त्याच्याकडे असा कोणताही परवाना नसल्याचे सांगून त्याने त्याचेकडील ल्युब ऑईल विकण्याचा परवाना सादर केला. सदर परवान्यामध्ये (only for the activity of sale) Trading activity without Storage असे नमूद केले होते. यावरुन त्याने पेट्रोलजन्य पदार्थाची विनापरवाना साठा करुन ठेवल्याची नमूद पथकाची खात्री झाल्याने त्याच्या समंतीने गोडावूनची पहाणी करुन केली असता, गोडावूनमध्ये २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले २०० ड्रम एकूण ४०,००० लिटर, २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईलने व इतर ऑईलने भरलेले ७० ड्रम एकूण १४,००० लिटर, ३५ लि. क्षमतेचे ल्युब ऑईलने भरलेले ०३ प्लॅस्टीक कॅन एकूण १०५ लि. ऑईल, २०० लि. क्षमतेचे ५० रिकामे लोखंडी ड्रम, भेसळीसाठी लागणारे साहित्य २००० लि. क्षमतेच्या ०६ रिकामी लोखंडी टाक्या, लोखंडी बादली एक, ०४ नरसाळे, १० लि.

क्षमतेचे ०२ मापे, २० लि. क्षमतेचे ०२ रिकामे ड्रम, १० किलो पांढऱ्या रंगाची पावडर, १ लोखंडी घाना, ०१ प्लॅस्टिक पाईप, ०३ इलेक्ट्रीक मोटार, पाईप लावलेल्या ०२ हातपंप असा एकूण ११,३०,१००/- रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. ताब्यात घेण्यात आलेला इसम नामे अब्दुल गफार महमंद हसन शेख याचेकडे अधिकाऱ्यांनी विचारपूस केली असता, त्याने बाजूच्या गोडावूनमध्ये सुध्दा पेट्रोलजन्य पदार्थाचा अवैधरित्या साठा करुन ठेवल्याचे सांगितल्याने सदर गोडावूनची तपासणी केली असता, गोडावूनमध्ये २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले ५० ड्रम एकूण १०,००० लिटर ऑईल, २०० लि. क्षमतेचे ३५ लोखंडी रिकामे ड्रम तसेच भेसळीसाठी लागणारे साहित्य २००० लि. क्षमतेची एक रिकामी लोखंडी टाकी, लोखंडी घाना, हातपंप व पांढरा पावडर ५० किलो असा एकूण २,१३,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. तदनंतर त्याच्याकडे अधिक चौकशी करता त्याने सांगितले की, त्यांच्या पाठीमागे जितूभाईच्या गोडावूनमध्ये सुध्दा अवैधरित्या पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा करुन ठेवलेला आहे. अशी माहिती दिल्यावरुन पोलिसांनी पंचासह सदर ठिकाणी प्रवेश केला असता, सदर गोडावूनमध्ये कोणीही इसम मिळून आला नाही. आजूबाजूच्या लोकांना गोडावून मालकाबाबत विचारपूस केली असता, त्यांच्याकडून समजले की, सदरचे गोडावून हे जितूभाई नावाच्या इसमाचे असून तो थोडया वेळापूर्वीच पोलिस आल्याची माहिती मिळाल्याने गोडावून उघडे सोडून निघून गेला आहे. सदर गोडावूनची तपासणी केली असता गोडावूनमध्ये, २०० लि. क्षमतेचे ल्युब ऑईल व इतर ऑईलने भरलेले ७५ ड्रम एकूण १५,००० लि. ऑईल तसेच भेसळीसाठी लागणारे साहित्य हातपंप ०२, नरसाळे ०२, लोखंडी घाना ०१, मीटर पट्टी असा एकूण ३,०२,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. अशाप्रकारे घटनास्थळी अधिकाऱ्यांनी वरील एकूण रुपये १६,४५,१००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केलेल्या द्रवपदार्थाचे नमुने पोलीसांनी रासायनिक पृथ:करणासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविले असता, सदर नमुन्यांचा पृथ:करण अहवाल 1) Exhibit Nos. 1 and 4 contain petroleum hydrocarbon oil having density at 30 °C is 0.851 and 0.836 respectively and flash point [illegible] °C, 2) Exhibit No. 2 contains petroleum hydrocarbon oil with blue dye and water, 3) Exhibit No. 3 and 6 contain sodium carbonate, 4) Exhibit No. 5 contain petroleum hydrocarbon oil and water असा प्राप्त झालेला आहे. सदर पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने नमुन्यांचा गोदाम निहाय अहवाल पोलिसांकडून मागविण्यात आला असता, आरोपी अब्दुल गफार यांचे गोडावून क्र. १ मधील लोखंडी ड्रममधून ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमून्यास exhibit १, गोडावूनं क्र. १ मधील प्लॅस्टिक कॅनमधून ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमून्यास exhibit २, गोडावून क्र. १ मधील पांढऱ्या रंगाच्या पावडरच्या गोणीमधील ताब्यात घेतलेल्या नमून्यास exhibit ३, आरोपी अब्दुल गफार यांचे गोडावून क्र. २ मधील लोखंडी ड्रममधून

ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमून्यास exhibit ४, गोडावून क्र. २ मधील पांढऱ्या रंगाच्या पावडरच्या गोणीमधील ताब्यात घेतलेल्या नमून्यास exhibit ६ तसेच आरोपी जितेंद्र पुनमचंद शहा यांचे गोडावून क्र. ३ मधील लोखंडी ड्रममधून ताब्यात घेतलेल्या द्रवपदार्थाच्या नमून्यास exhibit ५ असे संबोधण्यात आले असल्याचा अहवाल पोलिसांकडून प्राप्त झाला आहे.

मे. ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनीचे तसेच गोदाम क्र. १ व २ चे मालक अब्दुल गफार मोहम्मद हसन शेख यांनी केलेल्या खुलाशात, ते मे. ए.जी.एस. ट्रेडिंग कंपनीचे मालक असून त्यांच्या कंपनीच्या नावे उद्योग सहसंचालक यांचेकडील ल्युब्रिकंटस ऑर्डर, १९८७ नुसार जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अन्वये परवाना आहे. सदर कंपनीच्या नावे बृहन्मुंबई महानगरपालिकाकडील ल्युब्रिकंट साठवणूकीचे २३००० लिटर कमाल मर्यादा असलेले साठवणूकीचा परवाना आहे. त्यांची नमूद कंपनी अधिकृतरित्या नामांकित कंपनीकडून ल्युब्रिकंटचा साठा खरेदी करुन बाजारात विक्री करीत आहे. उद्योग सहसंचालक यांचेकडील परवान्यानुसार ते ल्युब्रिकंटच्या व्यवसायाकरिता पात्र असून तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडील अनुज्ञप्तीनुसार ल्युब्रिकंटच्या साठवणूकीचे कमाल मर्यादा नमूद नाही. त्यामुळे त्यांना साठवणूकीस कमाल मर्यादा लागू नाही, असे सांगितले.

सदर गुन्ह्यातील गोडावून क्र. १ व २ मधील जप्त साठ्याचे मालक अब्दुल गफार मोहम्मद हसन शेख यांनी "दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स अॅण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय अॅण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७" मधील तरतुदीनुसार ल्युब्रीकेटींग ऑईलच्या अंतीम उत्पादन साठा व ग्रीसेसच्या व्यवसायाकरीता आवश्यक असलेला परवाना क्र. एमएमआर/ल्युब ऑईल ग्रिस ऑर्डर/०१२९/२००३ दिनांक २३/०७/२००३ अन्वये दिनांक २२/०७/२०१३ पर्यंत विधीग्राह्य असलेला संबंधित प्राधिकरणाकडून परवाना प्राप्त केला असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे सदर गोडावून क्र. १ व २ मधील जप्त साठ्याचे मालक यांनी सुनावणीचेवेळी, पेट्रोलियम द्रवपदार्थाच्या साठवणुकीकरीता आवश्यक असलेला बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील सादर केलेला साठवणूक परवाना पहाता, त्यामध्ये ल्युब्रिकेटींग ऑईल २३००० लिटर, केरोसिन ५० लिटर व ग्रिस ५०० किलो अशी कमाल साठवणूक मर्यादा नमूद आहे. दिनांक १९/०१/२००५ रोजीचे विस्फोटक विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या पत्रामध्ये पेट्रोलियम अॅक्ट १९३४ चे कलम ७ (ii) अन्वये पेट्रोलियम पदार्थाची ४५००० लिटर पेक्षा कमी साठवणूक करीत असलेल्या व्यापाऱ्यास विस्फोटक परवाना घेण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद आहे. तसेच मुंबई अग्निशमक दलाचे चिफ फायर ऑफिसर यांचे दिनांक १५/०९/२००४ रोजीच्या नाहरकत पत्रामध्ये गोडावून क्र. १ व २ च्या मालकास ल्युब्रिकेटींग ऑईल २३००० लिटर, केरोसिन ऑईल ५० लिटर व ग्रिस ५०० किलो ची कमाल साठवणूक मर्यादा नमूद आहे. यावरुन गोडावून क्र. १ व २ चे मालक यांनी त्यांना महानगरपालिकेकडील साठवणूक

परवानामध्ये साठवणूकीची कमाल मर्यादा नमूद असतानाही त्यांनी खुलाशात, ल्युब्रिकंटच्या साठवणूकीचे कमाल मर्यादा नमूद नसल्याने त्यांना साठवणूकीस कमाल मर्यादा लागू नाही, असे सांगून ते मोघम स्वरुपाचे निवेदन सादर करुन दिशाभूल करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, पोलिसांना घटनास्थळी असलेल्या गोदाम क्र. १, २ व ३ मध्ये ल्युब ऑईल सारख्या ज्वालाग्राही पदार्थांचा साठा करुन ठेवल्याचे व सदर पेट्रोलजन्य पदार्थामध्ये कोणतेतरी रासायनिक द्रव व पावडर भेसळ करीत असल्याचे दिसून आले असून सदरच्या गोदामातून पोलिसांनी भेसळीसाठी लागणारे साहित्य म्हणून पांढऱ्या रंगाची पावडर व इतर साहित्यही जप्त केले आहे. तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल आरोपीतास परत करण्यास त्यांची सक्त हरकत असल्याचे नमूद आहे. रासायनिक पृथःकरण अहवालानुसार Exhibit No. 2 contains petroleum hydrocarbon oil with blue dye and water व Exhibit No. 3 and 6 contain sodium carbonate असल्याचे निष्पन्न झाले आहे. गोदाम क्र. १ व २ मध्ये blue dye and water मिश्रित पेट्रोलियम द्रवपदार्थ तसेच sodium carbonate या पावडरचा साठा असल्याचे सिध्द झाल्याने सदर जप्त साठ्याचा मालक हा नमूद दोन्ही गोदामात विनाखरेदी बिलांचा अवैध साठा गैरमार्गाने प्राप्त करुन सदर पेट्रोलियम द्रवपदार्थामध्ये ब्ल्यु डाय, पाणी व सोडियम कार्बोनेटचे मिश्रण करुन सदरचा मिश्रित केलेला भेसळयुक्त द्रवपदार्थाचा साठा विक्री करुन शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, गोडावून क्र. १ व २ मधील जप्त केलेला संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच पोलिसांनी घटनास्थळी गोडावून क्र. १ मध्ये ५४१०५ लिटर व गोडावून क्र. २ मध्ये १०००० लिटर असे मिळून एकूण ६४१०५ लिटर पेट्रोलियम द्रवपदार्थ जप्त केल्याचे दिसून येत असल्याने गोडावून क्र. १ व २ चे मालक यांनी पेट्रोलियम द्रवपदार्थाच्या व्यवसायाकरिता विस्फोटक परवाना घेणे क्रमप्राप्त आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील साठवणूक परवाना व मुंबई अग्निशमक दल यांचेकडील नाहरकत परवानामधील ल्युबिकेटींग ऑईलची कमाल साठवणूक मर्यादा २३००० लिटर नमूद आहे. यावरुन गोडावून क्र. १ व २ चे मालक यांनी विस्फोटक परवाना प्राप्त करुन न घेता तसेच महानगरपालिका यांचेकडील पेट्रोलियम पदार्थाच्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त साठवणूक केल्याने त्यांना देण्यात आलेल्या साठवणूक परवानाच्या तरतूदींचा भंग केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. सबब, परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सहसंचालक (एमएमआर), बृहन्मुंबई महानगरपालिका या परवाना प्राधिकरणास, मुंबई अग्निशमक दलाचे चिफ फायर ऑफिसर तसेच विस्फोटक विभाग यांना स्वतंत्र कळविण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे नमूद गुन्ह्यातील गोदाम क्र. ३ चे मालक जितेंद्र पुनमचंद शहा यांनी केलेल्या खुलाशात, ते मे. जे.पी. ल्युब्रिकंटसचे मालक असून त्यांचे कुर्ला कालिना रोड, मुंबई येथे गोदाम आहे. सदर कंपनीच्या नावे त्यांचे अशिलाकडे जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत उद्योग सहसंचालक यांचेकडील ल्युब्रिकंटच्या व्यवसायाकरिता आवश्यक असणारा परवाना असून या व्यतिरिक्त त्यांचे अशिलाकडे बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील नमूद गोदामावर १५००० लिटर ल्युब्रिकंट साठवणूक करण्याकरिता साठवणूकीचा परवाना असल्याचे सांगितले आहे.

सदर गुन्ह्यातील गोडावून क्र. ३ मधील जप्त साठ्याचे मालक जितेंद्र पुनमचंद शहा यांनी "दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७" मधील तरतुदीनुसार मे. जे.पी. ल्युबिकन्टस या कंपनीच्या नावे ल्युब्रीकेटींग ऑईलच्या अंतीम उत्पादन साठा व ग्रीसेसच्या व्यवसायाकरीता आवश्यक असलेला परवाना क्र. बीएमआर/ल्युब ऑईल ग्रिस ऑर्डर/८७/०३३१/८८ दिनांक ३०/०६/१९८८/२१४६ अन्वये दिनांक २७/०७/२०१५ पर्यंत विधीग्राह्य असलेला संबंधित प्राधिकरणाकडून परवाना प्राप्त केला असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे सदर गोडावून क्र. ३ मधील जप्त साठ्याचे मालक यांनी सुनावणीचेवेळी, पेट्रोलियम द्रवपदार्थाच्या साठवणुकीकरीता आवश्यक असलेला बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील सादर केलेला साठवणूक परवाना पहाता, त्यामध्ये मिनरल ऑईल १५००० लिटर अशी कमाल साठवणूक मर्यादा नमूद आहे. याव्यतिरिक्त त्यांनी जप्त साठ्याचे पुरावेदाखल इतर आवश्यक पुरावादर्शक कागदपत्रे सादर केल्याचे आढळून येत नाही. उद्योग सहसंचालक यांचेकडील वरील नमूद ल्युब ऑईलच्या परवान्याचे अवलोकन करता, सदर परवान्यामध्ये नमूद अटीनुसार परवानाधारकास नोंदणीकृत अनुज्ञप्तीधारक असलेल्या उत्पादक कंपनीकडून उत्पादित साठ्याचे व्यापार करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तथापी, गोडावून क्र. ३ चे मालक यांनी जप्त करण्यात आलेल्या पेट्रोलियम द्रवपदार्थाचे खरेदी बिले सादर केली नाहीत. यावरुन जप्त करण्यात आलेला साठा हा विनाखरेदी बिलांचा अवैध साठा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच रासायनिक पृथ:करण अहवालानुसार Exhibit No. 5 contain petroleum hydrocarbon oil and water असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार गोदाम क्र. ३ मध्ये जप्त करण्यात आलेला द्रवपदार्थाचा साठा हा पाणी मिश्रित असल्याने सदरचा साठा हा भेसळयुक्त असल्याचे सिध्द होत आहे. सबब, गोडावून क्र. ३ मधील जप्त केलेला संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

त्याचप्रमाणे पोलिसांनी घटनास्थळी गोडावून क्र. ३ मध्ये १५००० लिटर भेसळयुक्त पेट्रोलियम द्रवपदार्थ जप्त केल्याचे दिसून येते. तसेच मुंबई अग्निशमक दल यांचेकडील नाहरकत परवाना प्राप्त करुन घेतला नसल्याचे

दिसून येत आहे. सबब, परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सहसंचालक (एमएमआर) यांना स्वतंत्र कळविण्यात येत आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वाकोला पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३६/२०११, दि.२८/०१/२०११ (गु.शा.नि, गु.र.क्र. ०२/२०११) मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :**

१) प्रस्तूत प्रकरणी, गोडावून क्र. १ मधील जप्त केलेला २०० लि. क्षमतेचे २०० ड्रममधील ४०००० लिटर, २०० लिटर क्षमतेचे ७० ड्रममधील १४००० लिटर व ३५ लिटर क्षमतेचे ३ प्लॅस्टिक कॅनमधील १०५ लिटर असे मिळून एकूण ५४१०५ लिटर भेसळयुक्त द्रवपदार्थाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) गोडावून क्र. २ मधील जप्त केलेला २०० लि. क्षमतेचे ५० ड्रममधील १०००० लिटर भेसळयुक्त द्रवपदार्थाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

३) गोडावून क्र. ३ मधील जप्त केलेला २०० लि. क्षमतेचे ७५ ड्रममधील १५००० लिटर भेसळयुक्त द्रवपदार्थाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

४) उपरोक्त गोडावून क्र. १, २ व ३ मधील शासनजमा केलेल्या भेसळयुक्त साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) गोडावून क्र. १ मधील जप्त करण्यात आलेले संपूर्ण एकूण ३२० लोखंडी रिकामे ड्रम, ३ प्लॅस्टिकचे रिकामे कॅन, भेसळीसाठी लागणारे साहित्य २००० लि. क्षमतेच्या ०६ रिकामी लोखंडी टाक्या, एक लोखंडी बादली, ०४ नरसाळे, १० लि. क्षमतेचे ०२ मापे, २० लि. क्षमतेचे ०२ रिकामे ड्रम, १० किलो पांढऱ्या रंगाची पावडर, १ लोखंडी घाना, ०२ प्लॅस्टिक पाईप, ०३ इलेक्ट्रीक मोटार, पाईप लावलेल्या ०२ हातपंप इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) गोडावून क्र. २ मधील जप्त करण्यात आलेले संपूर्ण एकूण ८५ लोखंडी रिकामे ड्रम, भेसळीसाठी लागणारे साहित्य २००० लि. क्षमतेची एक रिकामी लोखंडी टाकी, लोखंडी घाना, हातपंप व ५० किलो पांढरा पावडर इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

७) गोडावून क्र. ३ मधील जप्त करण्यात आलेले संपूर्ण एकूण ७५ लोखंडी रिकामे ड्रम, भेसळीसाठी लागणारे साहित्य ०२ हातपंप, ०२ नरसाळे, ०१ लोखंडी पाना, मीटर पट्टी इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम, उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) गोडावून क्र. १ व २ चे मालक, अब्दुल गफार मोहम्मद हसन शेख
२) गोडावून क्र. ३ चे मालक, जितेंद्र पुनमचंद शहा (जितूभाई)
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, गु.अ.वि, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.